# सिनर्जी 2 + 2 = 4 ? 6 ?

1. मानवी व्यवहारात एकमेकांस समीप येणारे कित्येक घटक असतात. घटक म्हणजे व्यक्ती आणि संस्था. प्रत्येक घटकाकडे काही गुण व काही अवगुण असतात. त्यांमुळे एकमेकांस मदत किंवा त्रास होतात, किंवा काहीच होत नाही. हा विषय फार मोठा आहे. येथे एक नजर टाकली आहे. दोनांहून अधिक घटक देखील परस्परांवर प्रभाव पाडू शकतात. पण येथे एकाच वेळी फक्त दोन घटक विचारात घेऊ. प्रत्येकाकडे काही ऊर्जा (एनर्जी) असते. ते घटकाचे बलस्थान असते. घटकाचे काही न्यूनस्थान देखील असते. घटक स्वतंत्रपणे आपापले काम करतो, त्यातून त्यास काही लाभ होत असतो. समजा त्याला दोन युनिट लाभ होतो. दोन परस्परपूरक घटक एकत्र आले व काम करू लागले, तर दोघांना मिळून चार ऐवजी सहा युनिट लाभ होऊ शकेल. प्रत्येक घटकास दोनहून अधिक वाटा मिळेल. दोन्ही एनर्जी मिळून सिनर्जी (Synergy) झाली, असा शब्दप्रयोग करण्यात येतो. शब्द इंग्रजी आहेत, तरीही येथे वापरूया. (दोन, चार, सहा) हे आकडे उदाहरणार्थ आहेत. प्रत्यक्षात ते वेगवेगळे असू शकतील. प्रत्येकाची लाभवाढ हा मुद्दा आहे. वनस्पती, प्राणी यांचीही सिनर्जी असू शकते.

2. लंगडा आणि आंधळा ही सुप्रसिद्ध कथा सिनर्जीचे उदाहरण आहे. त्यांची बलस्थाने अनुक्रमे नेत्र व पाय. अलगपणे प्रत्येकजण जमिनीवर पडलेली 10 फळे जमवतो. पण आंधळ्याच्या खांद्यावरील लंगडा हाताने अथवा काठीने झाडावरून प्रत्येकास 15 फळे मिळवतो.

3. अनुवाद करणे ही सोपी कामगिरी नाही. अनुवादकाला दोन्ही भाषांचे ठीक ज्ञान असावे लागते. परदेशी यशस्वी लेखक (प्रकाशक) यानी खूप रॉयल्टी मागितली तर मराठी अनुवादाचे प्रकाशन करणे अव्यवहार्य ठरते. सौम्य अटींमुळे लेखक व अनुवादक यांना दोन्ही भाषिकात नाव मिळते व काही प्रमाणात द्रव्यलाभ होतो. कवितेस चाल लावणे सोपी गोष्ट नाही. कवीने सुरांसाठी थोडेसे शब्द बदलले किंवा गायक (दिग्दर्शक) यानी थोडेसे सुर बदलले तर सार्थ व सुरेल गीत निर्माण शक्य होते. कवी व गायक दोघांसही सन्मान मिळतो.

4. कधीकधी दोन कंपन्यांच्या लक्षात येते की एकीस उत्पादन चोख व वेळेवर करणे जमते, परंतु मार्केटिंगमध्ये ती यशस्वी नसते. दुसरीकडे याउलट गुण व अवगुण आहेत. दोन्ही कंपन्यानी सिनर्जी केली तर दोघींचेही लाभ वाढतात. कित्येक विदेशी कंपन्यांकडे नवे तंत्रज्ञान असते. पण भारतामधील कायदे, रूची वगैरे माहिती नसते. या बाबतीत सिनर्जी झाल्याची कित्येक उदाहरणे आहेत. आनंददायी गोष्ट अशी की मागासलेला देश ही भारताची प्रतिमा बदलली आहे. भारताने स्वदेशी तंत्रज्ञानाने काही देशांचे उपग्रह अवकाशात सोडले.

5. कधीकधी साहित्य संमेलनादि जंगी कार्यासाठी दोन संस्था एकत्र येतात, अथवा लहान परिसंवाद एवढेच माफक उद्दिष्ट असते. टेनिस, ब्रिज व अन्य काही क्रीडा सामन्यात पूरक भिडू योजितात. टेहेळणीप्रवीण व गोळीबारप्रवीण, असे दोन्ही प्रकारचे लोक नेमून, म्हणजेच सिनर्जी साधून, दहशती कृत्ये केली जातात. सिनर्जीमुळे

समाज घडतो की बिघडतो हा अभ्यासाचा एक निराळा विषय आहे.

6. इंस्टिट्युशन ऑफ इंजिनिअर्स आणि मराठी विज्ञान परिषद

यांची येथे खास नोंद केली पाहिजे. पुण्यात 2002 पासून मासिक मराठी व्याख्याने इंस्टिट्युशन मध्ये ठेवली जातात. समजा सभेत हजेरी 50 असली, तरीपण त्यांच्या वार्तापत्रांमध्ये 5000 लोकांपर्यंत व्याख्यानसार जाते. कधीकधी प्रसारमाध्यमातून लाखो लोकांपर्यंत ही माहिती जाते. इंस्टिट्युशनची अनेक शहरात केंद्रे आहेत. 2002 ते 2009 या 8 वर्षात बेस्टसेंटर चषक व 50000 रुपये पारितोषिक पुणे केंद्रास 6 वेळा मिळाले. अभियंता व्यवसाय उन्नती, प्रशिक्षण यातील कार्य हे प्रमुख निकष आहेत. स्थानिक लोकभाषेत केलेले लोकशिक्षण हा दुय्यम निकष. काही शाळांत देखील हे प्रसारकार्य झाले. बहुतेक केंद्रे लोकशिक्षण करत नाहीत. विज्ञानप्रसाराचे कार्य करण्यास परिषदेस नवा वाव मिळाला. दोन्ही संस्थांचे अभिनंदन.

-- म. ना. गोगटे www.mngogate.com